
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 5 | JANUARY - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# 'सुलतान काळातील भारतीय धर्म आणि संस्कृती'




**वामन रामराव वैद्य**
**सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास**
**स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा, जि. जालना, महाराष्ट्र.**

**प्रस्तावना:-**

सुलतान शाही भारतात येण्याच्या अगोदर भारतामध्ये हिंदू राजांची सत्ता होती इस्लाम धर्मियांनी भारतावर अनेक आक्रमणे केली. महम्मद गझनीने भारतावर आक्रमण केले. आणि शेवटी मोहम्मद घोरीनेही भारतावर आक्रमण करून पृथ्वीराज चव्हाण या राजाचा पराभव केला. आणि इ.स. १२०६ मध्ये सुलतानशाहीची स्थापना केली. पहिला सुलतान हा कुतुबुद्दीन ऐबक झाला. ऐबक हा गुलाम घराण्यातील होता. सर्वप्रथम भारतामध्ये गुलाम घराण्याने राज्य केले. नंतर खिलजी घराण्याने राज्य केले. त्यानंतर तुघलक घराण्यांने राज्य केले. तुघलक घराण्या नंतर सय्यद घराण्यांने राज्य केले. त्यानंतर लोधी घराण्यांने राज्य केले. इब्राहीम लोधी च्या काळामध्ये सुलतानशाहीची सत्ता संपुष्टात आली. या सुलतानशाही मध्ये हिंदू धर्म आणि इस्लाम धर्म अशा दोन्ही धर्माने भारतामध्ये एक संस्कृती निर्माण केली.

सुलतानशाहीच्या पूर्वीची भारतातील धार्मिक परिस्थिती.

- **इस्लाम धर्माचा कट्टरपणा:-**भारतामध्ये मुसलमानी राज्याची स्थायी सत्ता स्थापन झाल्यानंतर इस्लाम धर्माचा प्रसार करण्याकरिता शासक वर्गाने अनेक प्रयत्न केले.
- **इस्लामचे तत्वज्ञान:-** इस्लाम एकेश्वरवादाचा उपासक होता. मूर्तीपूजा, जातीभेद.हीनकलीनत्व इत्यादी गोष्टींचा तो कट्टर विरोधक होता.
- **धार्मिक उदारमतवाद:-**हिंदू धर्माची तत्वे इस्लामच्या विरुद्ध होती त्यामुळे भारतात आलेल्या अनेक अन्य जमती प्रमाणे मुसलमान लोक येथील संस्कृतीत समाविष्ट होऊ शकले नाहीत. परंतु दीर्घकाळाच्या सान्निध्यामुळे दोघांचेही एकमेकांवर फार परिणाम झाले. दोघांचीही कट्टरता कालांतराने कमी होऊन उभयपक्षात सामाजिक व धार्मिक उदारमतवादी चळवळी सुरू झाल्या.
- **समतेचा मार्ग:-**सूफी संतांनी ईश्वर उपासना आणि समाजसेवा यावर विशेष भर दिला. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता त्याने एकांत साधना, संयम, दया-क्षमा-शांती व समतेचा मार्ग अवलंबिला. संसारिक भोगविलास आणि धर्मांधतेच्या भावनेचा परीत्याग करण्याचा त्यांनी सर्व धर्मियांना उपदेश केला. त्यांनी एक नवीन तत्त्वज्ञान भारतीय समाजापुढे ठेवले.
- **सहिष्णुता वादी वृत्ती:-**हिंदू धर्माचा परिणाम इस्लाम धर्मावर झाला व त्याचा परिणाम म्हणून सूफी नावाचा पंथ इस्लाम धर्मात उदयाला आला.या पंथांमध्ये ईश्वराची उपासना आणि समाजसेवा यावर विशेष भर देण्यात आला होता. त्याप्रमाणे त्यात धर्म

पिसाटपणा आणि शारीरिक भोगविलास यांचा निषेध करण्यात आलेला होता. यात ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती, बाबा गेसुदराज इ. संत होऊन गेले. त्यांनी वरील गोष्टीवर विशेष भर दिला व त्यामुळे मुसलमान धर्म पिसाटपणाची भावना बरीच कमी झाली.

- **भक्ती पंथाचे तत्त्वज्ञान:-**दिल्ली सुलतानशाही राज्यात मंदिराचा नाश, मूर्तीची विटंबना, धार्मिक उत्सवाला मनाई, मानहानी कारक जिझिया कर ,गुलामगिरीची पध्दत आणि मुसलमान धर्म या सर्व गोष्टीचा हिंदू धर्मावर विपरीत परिणाम होता.अशा परिस्थितीत ह्या दुर्बल समाजाला निर्भय बनविणारे एक तत्वज्ञान उदयाला आले. ते तत्वज्ञान म्हणजे भक्ति पंथाचे तत्त्वज्ञान होय.
- **भक्ती चळवळ:-** माणसाने माणसात उच्चनीचता, अंधश्रद्धा, रूढी प्रियता या गोष्टी टाकून देऊन सामाजिक समतेवर आधारलेली भक्ति स्वीकारावी असे ह्या नवीन तत्वज्ञानाने सांगितले. भक्तिमार्गाची चळवळ म्हणून ओळखले जाते. अशाप्रकारे दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात धार्मिक परिस्थिती असल्याचे दिसून येते.
- **सूफी चळवळ : सूफी संप्रदायाचा विकास :-**इस्लाम एकेश्वरवादाचा उपासक होता. मूर्तीपूजा, जातीभेद,हिनकुलीनत्व इत्यादी गोष्टीचा तो कट्टर विरोधी होता. या सर्व बाबतीत हिंदू धर्माची तत्वे इस्लामच्या विरुद्ध होती. त्यामुळे भारतात आलेल्या अन्य जमाती प्रमाणे मुसलमान लोक येथील संस्कृतीतीत समाविष्ट होऊ शकले नाहीत. परंतु दीर्घकाळाच्या सान्निध्यामुळे दोघांचेही एकमेकांवर फार परिणाम झाले. दोघांचीही कट्टरता कालांतराने कमी होऊन उभयपक्षात सामाजिक व धार्मिक, उदारमतवादी चळवळी सुरू झाल्या.

इस्लाम मध्ये हिंदू धर्माच्या प्रभावामुळे आणि उदारमतवादी विचार प्रणाली सुरू झाल्या. त्यात सुख ही विचारप्रणाली विशेष प्रसिद्ध होती. सूफी संतांनी ईश्वर उपासना आणि समाजसेवा यावर विशेष भर दिला. हे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता त्यांनी एकांत साधना सय्यम दया-क्षमा-शांती व समतेचा मार्ग अवलंबिला. संसारिक भोगविलास आणि धर्मांधतेच्या भावनेचा परित्याग करण्याचा त्यांनी उपदेश केला. त्यांनी एक नवीन तत्त्वज्ञान भारतीय समाजापुढे ठेवले.

### सूफी संत व त्याचे :

१) **ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती :** हे संत भारतातील सूफी संतात अग्रगण्य आहेत. त्यांचा जन्म ११४२ ला मध्य आशियात झाला. ते लहानपणापासूनच विरक्त होते. ईश्वरभक्तीकडे त्यांचा विलक्षण ओढा होता. समरकंद, बगदाद, हमदान, मक्का इत्यादी पवित्र स्थळांना त्यांनी भेटी दिल्या .

चिस्ती संप्रदायाचे प्रवर्तक शेख अब्दुल कादिर जीलानी चे खाजा मोहिनुद्दीन शिष्य होते. नंतर ते चिस्ती संप्रदायाचे प्रमुख बनले. पुढे या संप्रदायाच्या प्रसारासाठी ते भारतात आले. त्यांनी आजमेरे येथे वास्तव्य केले. इ.स. १२३६ ला ते मरण पावले. प्रतिवर्षी अजमेर येथे त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी उरूस भरतो. त्यात असंख्य हिंदूमुस्लीम लोक सहभागी होतात.

२) **बाबा फरिदुद्दिन:** सन ११७३ ला बाबा फरीदुद्दीन चा जन्म काबूलच्या राजघराण्यात झाला. बाबा फरिद धनदौलत सोडून वैराग्य धारण केले होते त्यांनी बऱ्याचश्या मुसलमान देशात ब्राह्मण गेले होते. बगदाद येथील सूफी संतांकडून त्यांनी धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. मुलतान ते दिल्ली रस्त्यावर सतलज नदीकाठी त्यांनी एक कुटी तयार केली व तिच्यात ते राहू लागले. त्यांचे विचार अत्यंत उच्च प्रतीचे होते. त्यांच्या उपदेशाने हिंदू व मुस्लिम दोघेही प्रभावित झालेले होते. त्यांचे निधन सन १२६५ ला झाले.

३) **ख्वाजा बंदेनवाज उर्फ गेसुदराज :** गेसूदराज यांचा जन्म सन.१३२१ ला दिल्लीमध्ये झाला लहानपणी त्याबरोबर ज्ञानार्जनासाठी त्यांनी दक्षिण व उत्तर हिंदुस्थानच्या वाऱ्या केल्या होत्या. स.न. १३५६ मध्ये दिल्ली येथे उद्भवलेल्या महामारीच्या साथीत त्यांनी दिल्लीकरांची फार सेवा केली. फिरोजशहा बहामनीच्या आग्रहावरुन त्यांनी गुलबर्गा येथे कायमचे वास्तव्य केले. सन १४२२ मध्ये ते मरण पावले.

४) **शेख निजामुद्दीन अवलिया :** यांचा जन्म सन १२३८ मध्ये बदायूं येथे झाला. लहानपणीच वडील वारल्यामुळे त्यांचे पालन पोषण व शिक्षण त्यांची आई जुलेखाबीबी हिने केले. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांनी हजरत बाबा फरीदुद्दीन यांचे शिष्यत्व पत्करले.

निजामुद्दीनांचा विनम्र सेवाभाव, कर्तव्यपरायणता व भक्तीमुळे प्रसन्न होऊन त्यांच्या गुरूने त्यास शेख कुतुबुद्दीन बक्ती यार काकीची पगडी दिली. यानंतर गुरूंच्या आज्ञेवरून ते दिल्लीला राहू लागले.

अन्य सूफी संता प्रमाणे निजामुद्दीन अवलिया हे ही संगीत, नृत्य, भजन इत्यादी साधनांच्या द्वारे ईश्वर उपासना करीत. कट्टर सुन्नीपंथी असल्याने ही त्यांची कृत्ये इस्लामी विरुद्ध आहेत. हे सिद्ध करण्यासाठी गयासुद्दीन तुघलकाने इस्लामी उलेमा व मौलवी ची एक विद्वत परिषद बोलाविली सन १३३५ मध्ये त्यांचे निधन झाले.

## सूफी संप्रदायाची शिकवण व तत्त्वे :

सुखी संप्रदायात भक्ती संप्रदायाप्रमाणे अनेक पंथ पडले असून भारतातील सूफीमध्ये चिस्ती, कादरी, सुरहावर्दी आणि नक्शबंदी या चार परंपरा विशेष प्रभावी होत्या. त्या सर्वांची शिकवण सारखी नव्हती. तरीपण सर्व सूफी संप्रदायात काही समान तत्वे पुढीलप्रमाणे दिसतात.

## सूफी संप्रदायाचे चार आधारस्तंभ :

१) **कुराण**-कुराण म्हणजे धर्मग्रंथ.
२) **मदतीस** : या ग्रंथात पैगंबराच्या आख्यायिका सांगितल्या आहेत.
३) **फिक-** फिक म्हणजे व्यवहार धर्मशास्त्र होय.
४) **तरिका**:- अथवा तरीकन म्हणजे सुखी तत्त्वे.

या चार गोष्टीवर सुफी पंथाची शिकवण आधारित आहे. ही चार तत्वे मोक्षप्राप्तीची खरी आधारस्तंभ समजली जातात.१) गुरु महात्म्य २) सदाचार ३)षड्रिपूंचे दमन ४) ईश्वर सर्वशक्तीमान आहे ५) नियमित प्रार्थना ६) नाम महिमा ७) यात्रा व दानधर्म ८) **दारिद्र्य**:- श्रीमंतापेक्षा गरिबांना पाचशे वर्षे अगोदर ईश्वर प्राप्त होतो. म्हणून दरिद्री असावे. ९) ईश्वर ध्यान. १०) फना:ख फना म्हणजे समाधी.

अशा प्रकारे ईश्वराची त्कट भक्ती करून ईश्वराशी एकरूप व्हावे व्हावे म्हणजेच आपला आत्मा ईश्वरात विलीन करावा अशी या पंथाची विचारसरणी आहे.

## भक्ती चळवळ :-

भक्ती मार्गाच्या चळवळीच्या उत्पत्ती संबंधी इतिहासकारात परस्पर भिन्न मते प्रचलित आहेत. भक्तिमार्गाचा चळवळीचा प्रारंभ दक्षिण भारतात झाला की उत्तर भारतात यावर सुद्धा विद्वानांत मतभेद आहेत. इ.स. च्या पाचव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत दक्षिण भारतात भक्तिचा प्रादुर्भाव झालेला होता. हे दक्षिण भारताच्या तामिळनाडूत झालेल्या अलवार संताच्या साहित्या वरून दिसून येते. हे अलवार संत बहुदा समाजातील कनिष्ठ जातीत जन्माला आलेले होते. त्यांचे शिक्षणही फारसे नव्हते. पण त्यांनीही उपदेशात्मक काव्य रचले. त्यात प्रपती, शरणागती, आत्मसमर्पण आणि एकांत, निष्ठा या भक्ती च्या वेगवेगळ्या अवस्था पहावयास मिळतात.

अलवार संतांच्या तामिळ भाषेतील पदां चार संग्रहात प्रबन्धम् करण्याचे काम नवव्या शतकातील नाथमुनी यांनी केले. या संग्रहानाच प्रबंधम असे म्हणतात. प्रबंधम च्या विचारांना उत्तर भारतात पोहोचविण्याचे कार्य दक्षिणेत जन्मलेल्या पण उत्तर भारतात प्रचार कार्यास्तव गेलेल्या अनेक वैष्णव संतांनी केले. अलवार व नायनार संत ईश्वर भक्तीने झपाटलेले होते. विष्णू व शिव हे त्यांचें आराध्य दैवत होते. वीरशैव (लिंगायत) संप्रदायाची स्थापना कलचुरी राजा बीज्जलाचे (इ.स. ११५६-६७) दिवान बसवाचार्य यांनी केली.

विरशैव तत्त्वज्ञान अनेक बाबतीत खऱ्या अर्थाने सुधारणावादी विचारांचे होते. समाज सुधारणे हाच विचार महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी विकसित केलेल्या महानुभाव पंथाच्या तत्वज्ञानात ही पहावयास मिळतो.

**भक्ती चळवळीचा उदय:-**

दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात उदयास आलेली भक्तिमार्गाची चळवळ अथवा सुधारणा चळवळ ही एकाएकी निर्माण झालेली नव्हती. तर हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्माच्या परस्परांच्या संपर्कात येण्यामुळे काही विशिष्ट परिस्थितीमुळे तिचा उदय झाला असे काही इतिहासकारांचे मत आहे. या चळवळीची जी कारणे सांगितली जातात त्यापैकी काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) **पलायनवाद:-**बाराव्या शतकापासून ते पंधराव्या शतकापर्यंत भारतात सर्वत्र हिंदू राजपूतप्रशासकांचा पराजय होऊन मुसलमानी राज्याची स्थापना झाल्यामुळे हिंदू धर्म अनुयायी पूर्णपणे निराश झाले होते.अशा परिस्थितीत दैववादी हिंदू जर परमेश्वराची उपासना करण्याकडे वळाले तर त्यात नवल नव्हते.

२) **हिंदू धर्मातील दोष :-**प्राचीन काळापासून हिंदू धर्मात अनेक दोष निर्माण झाले होते. ते दोष दूर करण्याकडे या काळातील संतांनी आपले लक्ष केंद्रित केले होते. बहु देवता वादांचा संताने विरोध केला व एकाच आराध्य दैवताची उपासना करण्याचा उपदेश जनतेला केला.

३) **सूफी संप्रदायाचा परिणाम :-**इस्लाम धर्मातील उदारमतवादी विचारधारेतील एक शाखा सूफी माताची म्हणून ओळखली जाते. सूफी संप्रदायाच्या संतांची जीवनपद्धती, त्यांची शिकवण, ईश्वर भक्ती, धार्मिक सहिष्णुता व कर्मकांड विरोध इत्यादींचा हींदूवरही खूप परिणाम झाला. याच विचारसरणीचा अंगिकार अनेक हिंदू संतांनी केला

४) **समन्वयाची भावना :-**हिंदू व मुस्लिम यादोन्ही धर्माच्या लोकांच्या हे लक्षात आले की त्यांच्यात असलेले वैर, घृणा व द्वेष इत्यादी दोघांकरिता घातक आहेत. त्यामुळे उभय धर्मातील विचारवंत व साधुसंत सामंजस्याच्या अथवा ऐक्याच्या मार्गाचा शोध घेऊ लागले. अशा प्रकारे भक्तिमार्गाचा शोध लावला गेला. त्यामुळे दोन्ही जातीचे लोक एक दुसऱ्याच्या खूप जवळ येऊ लागले

**भक्ती पंथाची शिकवण :-**

या पंथाची शिकवण अनेक संतांच्या वचनात व रचना आढळते त्यावर प्राचीन भारतीय धार्मिक वांग्मयाचा प्रभाव पडलेला आहे.

१) भक्ती द्वारा मुक्ती मिळते.२) जन्ममृत्युच्या चक्रातून सुटकेसाठी मोक्ष.३) मुक्तीसाठी गुरु व ईश्वर नामाचा जप.४) ईश्वर एक आहे त्याला शरण जावे ५) मूर्तीपूजा व्यर्थ आहे देव सर्वत्र आहे.६) भगवद् गीता प्रमाण मानणे. ७) वर्णव्यवस्थेचा विरोध.८) जातिभेद व अस्पृश्यता अमान्य समतेचा पुरस्कार.९) अंधश्रद्धा व दांभिकतेवर टीका १०) मानवतावादी व हिंसक वृत्ती. ११) संस्कृत ऐवजी प्राकृत भाषेचा स्विकार.१२) हिंदू-मुस्लीम एक आहेत.

भक्तिमार्ग चळवळीचे कार्यक्षेत्र उत्तर व दक्षिण भारत किंबहुना संपूर्ण देश होता. या काळात जे संत झाले त्यांनी आपल्या सुलभ काव्याच्या द्वारे लोकांना उपदेश करण्याचा प्रयत्न केला. व संतांच्या कार्याचा थोडक्यात परिचय पुढीलप्रमाणे करून देता येईल.

**१) रामानुजाचार्य:-**भक्ती मार्गाचे पहिले प्रवर्तक स्वामी रामानुजाचार्य हे बाराव्या शतकात होऊन गेले. शंकराचार्यां नंतर रामानुजाचार्य श्री वैष्णव पंथाच्या गादीवर आरूढ झाले. अत्याचारांना कंटाळून त्यांनी कांची सोडून यादव राज्यात वास्तव्य करणे पसंत केले. ते वैष्णव पंथीय होते. त्यांनी त्रिचनापल्ली जवळ श्रीरंगम या गावी राहून धर्माचा प्रसार केला. त्यांनी शंकराचार्यांचा मायावाद व अद्वैत वादाचे खंडन करून त्याजागी विशिष्टाद्वैत वादाचा प्रचार केला. सगूण ब्रह्माचे ते एकमेव उपासक होते. सगुण ब्रह्माची प्राप्ती करण्यासाठी त्यांनी भक्तिमार्गाची कास धरा असा उपदेश केला. याकरिता ते विष्णूच्या पूजेचा पुरस्कार करीत असत. त्यांना सगूण भक्ती मान्य होती. ब्रह्म व आत्माही वेगवेगळे आहे हे प्रतिपादन करणारे हे पहिले भक्तिमार्गी संत होते. त्यांनी आपल्या जीवनात सातशे वैष्णव मठांची स्थापना केली. भक्तीमार्गाच्या चळवळीत रामानुजाचार्य यांचे स्थान अनन्यसाधारण समजले जाते.

**२) त्र्यंबकाचार्य :-**हे रामानुजाचार्य यांचे समकालीन आणि वैष्णव धर्मातील कृष्ण उपासक शाखेचे प्रवर्तक होते. त्यांचा जन्म मद्रास जवळील बल्लारी जिल्ह्यात निंबापुर येथील एका तेलुगु ब्राह्मणांच्या घरी झाला. शंकराचार्यांचा अद्वैत वाद आणि रामानुजांचा

विशिष्टाद्वेदवाद या दोन्ही मधून त्यांनी मध्ये मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्ण भक्ती केल्यास कोणालाही मोक्ष मिळू शकेल असे ते सांगत असत. मथुरेत सभोवतालच्या प्रदेशात त्यांच्या मताचा बराच प्रसार झाला.

३) **माधवाचार्य :-**यांचा जन्म इ.स.१२०० मध्ये दक्षिणेत शृंगेरी पासून ६० मैलावर दूर उडपी जिल्ह्यात झाला ते विष्णूचे उपासक होते. त्याने दक्षिण भारत आणि गुजरात या प्रदेशात आपल्या मताचा प्रसार केला. ज्ञानामुळे भक्ती आणि भक्तीमुळे मोक्ष मिळतो अशी त्यांची शिकवण होती.

४) **रामानंद:-** १४ व्या शतकापासून अलाहाबादच्या एका कन्वकुब्ज कुटुंबात रामानंदाचा जन्म झाला. रामानंद वैष्णव पंथी होते. रामावर त्यांची अतिशय भक्ती होती. त्यांनी जाती जाती भेद न करता सर्वांकरिता भक्ती मार्गाचा पुरस्कार केला. भक्तिमार्गात स्त्री-पुरुष असा भेद सुद्धा त्यांनी मान्य केला नाही. त्यामुळे त्यांच्या पंथात सर्व जातीचे सर्व पंथाचे लोक येऊन सामील झाले. त्यांच्या प्रमुख बारा शिष्यांपैकी एक न्हावी, एक तांबोळी, एक मुसलमान विणकर होता. त्यांनी आपला प्रचार हिंदी भाषेत केला.

५) **वल्लभाचार्य :-**भक्तिमार्गाचे दुसरे पुरस्कर्ते म्हणजे वल्लभाचार्य होय त्यांचा जन्म इ.स.१४६९ मध्ये दक्षिण भारतात लक्ष्मण भट्ट नामक एका तेलुगु ब्राह्मणाच्या घरी झाला. लहानपणापासूनच अतिशय प्रेमभावाने युक्त होते. आपले शिक्षण संपल्यानंतर ते निरनिराळ्या तीर्थयात्रा करण्याकरता निघाले असता यात्रेत ते विजयनगर येथे जाऊन पोहोचले तिथे त्यांनी कृष्नदेवरायाच्या दरबारास भेट दिली. तेथे त्यांनी शैवांच्या प्रमुख पंडितांना वादविवादात पराभूत केले. त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र माहीत झाले. त्यानंतर त्यांनी बनारसला कायमचा मुक्काम ठेवला. आणि तेथूनच आपल्या विचारांचा प्रचार केला. वल्लभाचार्य संस्कृतचे गाढे विद्वान होते. त्यांनी संस्कृतमध्ये १७ ग्रंथ लिहिले. कृष्णभक्तीचा पुरस्कार केला. वल्लभाचार्य यांनी शुद्धद्वेत वादाचा पुरस्कार केला. कृष्ण भक्तांनी आपले सर्वस्व कृष्णाच्या पायावर अर्पण करावे असा ते उपदेश करीत असत. संसारातील भोगविलास सोडून माणसाने वीरगती प्राप्त केली पाहिजे, असा उपदेश करीत असत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अनुयायांनी मात्र भोगविलासालाच ईश्वर मानले. त्यामुळे या संप्रदायात अनेक विकृती निर्माण झाल्या.

६) **चैतन्य महाप्रभू :-**बंगालमधील भक्तीमार्ग चळवळीचे प्रमुख प्रवर्तक म्हणजे चैतन्य महाप्रभू समजले जातात बंगाल मधील नडिया याठिकाणी एका ब्राह्मण कुटुंबात इ.स.१४८५ मध्ये त्यांचा जन्म झाला. चैतन्य हे वल्लभाचार्य यांचे समकालीन होते. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी संसाराचा त्याग करून संन्यास धर्माचा स्वीकार केला. त्या नंतरचे सर्व जीवन त्यांनी कृष्णभक्तिचा पुरस्कार करण्यात घालविले. भक्तिमार्गाचा प्रसार करण्याकरिता त्यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले. परंतु त्यांचा जास्त मुक्काम वृंदावन या ठिकाणी राहत असे. चैतन्याने जातीव्यवस्था, पशुबळी मांसाहार, मद्यपान इत्यादी गोष्टीचा निषेध केला. जाततीपातीवर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. बंगाल बिहार मध्ये त्यांना असंख्य अनुयायी मिळाले. बंगालमध्ये तर त्यांना विष्णूचा अवतार समजत असत. इ.स.१५१३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

७) **कबीर ,:-**मध्य काळातील या महान संताचा जन्म एका गरीब मुसलमान विणकर कुटुंबात झाला. त्यांचे गुरु रामानंद होते. कबीराला मूर्तिपूजा मंदिर मशिदीमध्ये जाणे. व्रतवैकल्य उपास-तापास, जातिभेद, धर्मभेद इत्यादी गोष्टी मान्य नव्हत्या. हिंदूमुसलमान या दोन्ही धर्मातील बाह्य अवडंबरावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. त्यांच्या अनुयायांत हिंदू आणि मुसलमान यांच्या समन्वय साधला जावा असे वाटत होते. हिंदू मुसलमान ऐक्य साधण्याकरता त्यांनी तळमळीने प्रयत्न केले

८) **नामदेव :-**भक्ती पंथातील महाराष्ट्रातील थोर संत म्हणजे नामदेव त्यांचा शिंपी कुळात जन्म झाला. जीवनभर त्यांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. पंधराव्या शतकात त्यांनी केलेले कार्य खरोखरच आश्चर्यकारक समजावे लागेल. जातीभेद मूर्तीपूजा यांचा त्यांनी निषेध केला. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषेत त्यांनी केलेली काव्य रचना आजही अप्रतिम समजली जाते. त्यांचे अनुयायी महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही प्रदेशात आढळून येतात.

९) **गुरुनानक:-**पंजाबात भक्तिमार्गाचा प्रसार करण्याचे सर्व श्रेय आपल्याला गुरुनानकांनी द्यावे लागते. पंजाबातील संता मध्ये नानकांची स्थान अतिशय श्रेष्ठ आहे. इ.स.१४६९ मध्ये एका खत्री कुटुंबामध्ये झाला. प्रारंभापासून नानकांची प्रवृत्ती ईश्वरभक्तिकडे होती. त्यानी सर्व हिंदुस्थानांत फिरून हिंदूमुसलमानातील अनेक संतांच्या भेटी घेतल्या. अवलोकनाच्या बळावर त्यांनी बरेच ज्ञान मिळविले.

नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. ते एकेश्वरवादी होते. आणि ईश्वराची भक्ती केल्याने मोक्ष प्राप्त होतो. अशी त्यांची श्रद्धा होती. १५३८ मध्ये त्यांचा मृत्यू घडून आला. नानकांची निरनिराळी वचने, उपदेश इत्यादींचा संग्रह गुरुग्रंथसाहेब या ग्रंथात करण्यात आलेला आहे. या ग्रंथाला शीख लोक अतिशय पवित्र मानतात.

**१०) सूरदास :-** वल्लभाचार्य आणि त्यांचा मुलगा विठ्ठलदास यांच्या आठ शिष्यात सूरदास यांची गणना होते. कृष्ण भक्तिचा त्यांनी आपल्या जीवनभर पुरस्कार केला. कृष्णभक्ती मुळेच प्रत्येकाला मुक्ती मिळते. अशी त्यांची श्रद्धा होती. सूरदासांच्या भक्तीपर रचनांचा अंतर्भाव सूरदास या ग्रंथात करण्यात आलेला आहे.

**११) तुलसीदास :-**रामभक्त रामानंद यांच्या शिष्य परंपरिक तुलसीदास यांचा अंतर्भाव होतो. तुलसीदासांनी रामाची अनन्य भक्ती केली. आणि सतत राम भक्तीचाच पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्तीने पवित्र त्यागमय आणि सरळ जीवन व्यतीत करावे असे त्यांनी सांगितले. तुलसीदासांनी लिहिलेले महाकाव्य रामचरीतमाणस ही एक महान वांग्मयीन कलाकृती समजली जाते.

**१२) मीराबाई :-**मिराबाई राजस्थानातील राठोड राजा रत्न सिंह यांची मुलगी होती मीराबाई चा जन्म इ.स.१५१६ मध्ये झाला. लहानपणापासून तिला कृष्णभक्ती चे वेड होते. आपल्या संपूर्ण जीवनभर तीने कृष्णभक्तीचाच पुरस्कार केला.

**१३) दादू द्याल :- इ.स.**१५५४ मध्ये दादू दयाल यांचा अहमदाबाद येथे जन्म झाला त्यांनी जातीभेद मूर्तीपूजा आदींचा निषेध केला जी व्यक्ती स्वतः ईश्वराला पूर्णपणे समर्पित करते त्याच व्यक्तीला ईश्वरी साक्षात्कार होतो असे त्यांचे मत होते इ.स.१६०३ मध्ये दादू दयाल यांचा मृत्यू झाला. त्यानंतर गरिबदास आणि ममाधदास यांनी दादू दयाल यांचे कार्य पुढे चालविले

**१४) संत तुकाराम :-** भक्तिमार्गाचा महाराष्ट्रात हिरीरीने पुरस्कार करणाऱ्या तुकारामांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. कर्मकांड, धर्मातील बाह्य अवडंबरे यांचा त्यांनी कडाडून विरोध केला. आणि परमेश्वराच्या अनन्यभक्तीचा पुरस्कार केला. तुकारामांनी अभंग लिहिले ते मराठी वांगमयात अमर ठरले.

याशिवाय भक्तिमार्गात रवीनाथ, ज्ञानेश्वर, एकनाथ, नरसी मेहता, इत्यादी संतांनी केलेले कार्य बहुमोल समजावी लागेल हे सर्व संत अलौकिक कवी होते त्यांनी रसाळ वाणीने स्पर्धांमधून जनजागृती केली होती.

## संदर्भ ग्रंथ

**१)** श.गो कोलारकर, प्राचीन भारताचा इतिहास.
**२)** एस.एस. गाठाळ भारताचा इतिहास.
**३)** मदन मार्डीकर , मध्ययुगीन भारताचा इतिहास.
**४)** मा.म.देशमुख , मध्ययुगीन भारताचा इतिहास.